D) केंद्र राज्य सबंध :

(Center -State Relations)

4.3 वित्तीय संबंध :

(Financial Relations)

आधुनिक शासन संस्था ही लोककल्याणासाठी कार्य करणारी राजकीय यंत्रणा असल्याचे मानले जाते. त्यासाठी पर्याप्त अधिकार व कार्य असलेले एक विशिष्ट स्वरूपाचे सरकार निर्माण करण्याची गरज निर्माण होते .राज्यघटना हा एक असाच दस्तावेज आहे. ज्यामध्ये शासनाचे स्वरूप व नागरिक आणि शासन यांच्यातील संबंधाचे निश्चिती केलेली आहे. राज्यघटना असा एक अत्यंत मूलभूत असा कायदा आहे. भारतीय राज्यघटना संघराज्यीय स्वरूपाची असल्याने केंद्र व राज्यांमध्ये कायदेविषयक, प्रशासकीय व वित्तीय अधिकारांची विभागणी करण्यात आली आहे. मात्र न्यायविषयक अधिकारांची विभागणी करण्यात आलेली नाही, कारण घटनेने केंद्रीय तसेच राज्य कायद्याच्या अंमलबजावणीसाठी एकाच एकात्मिक न्यायव्यवस्थेची निर्मिती केली आहे.जरी केंद्र व राज्य सरकारे आपापल्या क्षेत्रात सर्वोच्च असले तरी संघराज्यीय व्यवस्थेच्या प्रभावी कार्यचालनासाठी त्यांच्यामध्ये महत्तम सुसंवाद व समन्वयाची आवश्यकता आहे. त्यामुळे केंद्र व राज्यांमधील संबंधाच्या विविध बाजूंचे नियमन करण्यासाठी घटनेत विस्तृत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.• केंद्र-राज्य संबंधांचा अभ्यास तीन आधारावर केला जातो-

१) कायदेविषयक संबंध

२) प्रशासकीय संबंध

३) वित्तीय संबंध

*वित्तीय संबंध :

Financial relations:

घटनेच्या भाग XII मधील कलम २६८ ते २९३ दरम्यान केंद्र-राज्य वित्तीय संबंधांची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यांचा अभ्यास दोन पद्धतीने करता येईलः कराधिकारांची विभागणी आणि कर महसुलाची विभागणी.

*कराधिकाराची विभागणी:

(distribution of Taxing powers):

• घटनेमध्ये केंद्र व राज्यांमध्ये कराधिकारांची विभागणी पुढील करण्यात आलेली आहे:

1) संघ सूचीमधील विषयांवर कर आकारण्याचा अधिकार केन आहे. संघ सूचीमध्ये विषय क्रमांक ८२ ते ९२ C पर्यंत असे १४ करविषयक विषय आहेत.

ii) राज्य सूचीतील विषयांवर कर आकारण्याचा अधिकार केवळ विधानमंडळाला आहे. राज्य सूचीमध्ये विषय क्रमांक ४५ ते ६३ दरम्यान सुमारे १९ करविषयक विषयांचा समावेश आहे.

iii) समवर्ती सूचीतील विषयांवर कर आकारण्याचा अधिकार तसेच राज्य विधानमंडळाला आहे. समवर्ती सूचीमध्ये असे 3 विषय आहेत: यांत्रिक वाहने, स्टॅम्प ड्यूटी आणि या सूची कोणत्याही बाबीशी संबंधित शुल्क.

iv) कर आकारणीची शेषाधिकार संसदेकडे आहे. या तरतुदीच्या आधारे संसदेने देणगी कर, संपत्ती कर आणि खर्च कर यांची आकारणी केली होती.

● घटनेने करांची आकारणी, वसुली व विनियोजन (appropria-tion) यांबाबत स्पष्ट फरक केलेला आहे. (त्यांची माहिती पुढे दिलेली आहे.)

- **राज्यांच्या कराधिकारावरील बंधने:**

- **(Restrictions on taxing powers of the states):**

• घटनेने राज्यांच्या कराधिकारावर पुढील बंधने घातली आहेतः

१) राज्य शासन व्यवसाय, व्यापार, आजीवीका आणि नोकऱ्या यांवर कर आकारू शकते. मात्र, अशा कराची देय रक्कम कोणत्याही व्यक्तीसाठी एका वर्षाला रू.२,५०० पेक्षा जास्त असता कामा नये.

२) राज्य विधानमंडळ वस्तूंच्या (वर्तमानपत्रे वगळता) खरेदी-विक्रीवर कर आकारू शकते. मात्र, या अधिकारावर पुढील चार बंधने आहेत:

i) राज्याच्या बाहेर झालेल्या खरेदी-विक्रीवर कर आकारता येणार नाही.

ii) आयात-निर्यातीदरम्यान घडलेल्या खरेदी-विक्रीवर कर आकारता येणार नाही.

iii) आंतर-राज्यीय व्यापार आणि वाणिज्य परस्पर खरेदी-विक्रीवर कर आकारता येणार नाही.

iv) संसदेने कायद्याद्वारे आंतरराज्यीय व्यापार व वाणिज्याच्या दृष्टीने महत्वाच्या म्हणून घोषित केलेल्या वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर लावण्यात आलेला कर संसदेने निश्चित केलेल्या बंधनांच्या व अटींच्या अधीन असेल. (संसदेने तंबाखू, साखर, रेशीम, सुती व वूलन कपडे यांना आंतरराज्यीय व्यापाराच्या दृष्टीने महत्वाचे घ असल्याचे घोषित केले आहे.)

३) राज्य विधानमंडळ विजेच्या वापरावर व विक्रीवर कर आकारू शकते. मात्र, असा कर पुढील बाबतीत बाकारता येणार नाही:

i) भारत सरकारने वापरलेल्या किंवा भारत सरकारला विकलेल्या विजेवर कर आकारता येणार नाही.

ii) भारत सरकारने किंवा संबंधित रेल्वे कंपनीने रेल्वेची बांधणी, देखभाल किंवा रेल्वे चालविणे या कामी वापरलेल्या किंवा त्यांना विकण्यात आलेल्या विजेवर कर आकारता येणार नाही.

४) संसदेने कोणत्याही आंतर-राज्यीय नदी किंवा नदी खोऱ्याच्या नियमन किंवा विकासाकरता स्थापन केलेल्या कोणत्याही प्रधिकाऱ्याने साठविलेल्या, निर्माण केलेल्या, वापर केलेल्या, वाटप

केलेल्या किंवा विक्री केलेल्या पाण्याच्या किंवा विजेच्या बाबतीत राज्य विधानमंडळ कायद्याने कर आकारू शकते.

मात्र, असा कर आकारणीचा कायदा अंमलात येण्यासाठी तो राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवण्यात येऊन त्यांची संमती मिळणे आवश्यक असेल. तरच तो प्रभावी ठरेल.

*कर महसुलाची विभागणी:

(Distribution of Tax Revenues):

• केंद्र व राज्ये यांमधील कर महसुलाच्या विभागणीच्या व्यवस्थेमध्ये महत्वाचे बदल प्रथम ८० व्या आणि ८८ व्या घटनादुरूस्तीने, तर आता १०१ व्या घटनादुरूस्तीने (२०१६) घडवून आणले.

i)८० व्या घटनादुरूस्तीच्या (२०००) आधी, केंद्राने आकारणी व वसुली केलेल्या करांपैकी केवळ आयकर व केंद्रीय उत्पादन शुक्ल या करांपासून प्राप्त महसुलाचीच विभागणी केंद्र व राज्यांमध्ये केली जात असते.

मात्र, ८० व्या घटनादुरूस्तीने यात बदल करण्यात आला. आता केंद्राने आकारणी व वसुली केलेल्या सर्व करांची (सरचार्ज व सेस वगळता) विभागणी केंद्र व राज्यांमध्ये केली जाते.

ii) ८८ व्या घटनादुरूस्तीने (२००३) घटनेत 'सेवा करा'शी संबंधित कलम २६८A हे नवीन कलम टाकण्यात आले. तसेच संघ सूचीमध्ये ९२ C.हा नवीन विषय (सेवांवरील कर) टाकण्यात आला. सेवा कराची आकारणी केंद्र सरकार करते, मात्र त्याची वसुली व विनियोजन केंद्र तसेच राज्ये असे दोघांकडून केले जाते.

)१०१ व्या घटनादुरूस्तीने (२०१६) घटनेत जी.एस.टी. विषयक तरतुदी केल्या. त्यानुसार कलम २४६A हे नवीन कलम टाकून संसद आणि राज्य विधानमंडळांना जी.एस.टी. आकारण्यासाठी कायदे करण्याचे अधिकार देण्यात आले. तसेच २६८A हे सेवा कराचे कलम वगळण्यात आले, तर २६९A हे कलम नव्याने समाविष्ट करण्यात आले.

⁎घटनात्मक तरतुदी :

(Constitutional Provisions):

•८०, ८८ आणि १०१ व्या घटनादुरूस्तीनंतर कर महसुलाच्या केंद्र व राज्यांमधील विभागणीबद्दलच्या घटनात्मक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:

⁎कलम २६८: केंद्राने आकारणी केलेले मात्र राज्यांनी वसुली व विनियोजन केलेले कर

(Taxes levied by the Centre but collected and appropriated by the States)

• यामध्ये पुढील कर व शुल्कांचा समावेश होतोः

i) संघ सूचीत उल्लेख केलेली मुद्रांक शुल्क (मुद्रांक शुल्क): विनिमय पत्रे, धनादेश, वचनपत्रे, विमा पॉलिसी, शेयरचे यांवरील मुद्रांक शुल्क.

ii) औषधीय व प्रसाधन पदार्थांवरील उत्पादन शुल्के (excise duty)

• कोणत्याही राज्यात आकारणी केलेल्या वरील करांचे उत्पन्न भारताच्या संचित निधीचा भाग होणार नाही, तर ते त्या राज्याला नेमून दिले जातील.

⁎कलम २६८ A केंद्राने आकारणी केलेला आणि केंद्राने व राज्यांनी वसुली व विनियोजन केलेला सेवा कर

(Ser-vice tax levied by the Centre but collected and ap-propriated by the Centre and the States)

• सेवांवरील करांच्या आकारणी, वसुली आणि विनियोजनासाठी ८८ व्या घटनादुरूस्ती अन्वये टाकण्यात आलेले हे कलम १०१ व्या घटनादुरूस्ती अन्वये वगळण्यात आले आहे.

⁎कलम २६९: केंद्राने आकारणी व वसुली केलेले पण राज्यांना नेमून देण्यात आलेले कर

(Taxes levied and collected by the Centre but assigned to the States)

• या गटात पुढील कर येतातः

i) आंतर-राज्यीय व्यापारादरम्यान होणाऱ्या वस्तूंच्या (वर्तमानपत्रे वगळता) खरेदी किंवा विक्रीवरील कर.

ii) आंतर-राज्यीय व्यापारादरम्यान होणाऱ्या वस्तूंच्या (वर्तमानपत्रे वगळता) पाठवणीवरील (consignment) कर.

• वरील करांपासून प्राप्त होणारे निव्वळ उत्पन्न भारताच्या संचित निधीचा भाग होत नाही. त्यांपासून प्राप्त होणारे उत्पन्न संबंधित राज्यांना संसदेने ठरविलेल्या तत्वांनुसार दिले जाते.

⁎कलम २६९A : आंतरराज्यीय व्यापारावर जी.एस.टी. ची आकारणी व वसुली (Levy and collection of GST in course of inter-state trade and commerce)

● कलम २६९A हे कलम १०१ व्या घटनादुरूस्ती कायद्यान्वये समाविष्ट करण्यात आले. हे कलम आंतरराज्यीय व्यापारादरम्यान आकारावयाच्या GST बद्दल (म्हणजे IGST बद्दल) आहे. हा कर केंद्र सरकारकडून आकारला व वसूल केला जातो, पण त्याची वाटणी केंद्र व राज्यांमध्ये केली जाते.

⁎कलम २७०: केंद्राने आकारणी व वसुली केलेले पण केंद्र व राज्ये यांच्यामध्ये वितरित करण्यात येणारे कर

(Taxes levied and collected by the Centre but distributed between the Centre and the States)

• कलम २७० मध्ये अशा करांची तरतूद आहे जे कर केंद्र सरकारकडून आकारले व वसूल केले जातात, पण ज्यांची वाटणी केंद्र व राज्यांमध्ये केली जाते. केंद्र व राज्यांमध्ये कोणत्या कर उत्पन्नाची विभागणी केली जाईल, यात प्रथम ८० व्या घटनादुरूस्तीने (२०००), तर आता १०१ व्या घटनादुरूस्तीने (२०१६) मोठे बदल केले आहेत. त्यानुसार सद्ध्या कलम २६८, २६९, २६९८ आणि २७१ अंतर्गत सरचार्ज तसेच संसदीय कायद्यान्वये आकारलेले उपकर (cesses) वगळता इतर सर्व करांची विभागणी केली जाते. म्हणजेच वरील कर/सरचार्ज/सेस वगळता केंद्राने आकारणी व वसुली केलेल्या सर्व कर महसुलाची विभागणी केंद्र व राज्यांमध्ये केली जाते. अशी विभागणी केल्या जाणाऱ्या करांमध्ये मुख्यतः केंद्रीय अबकारी कर, वैयक्तिक आयकर, महामंडळ कर, भांडवली नफा करं या प्रत्यक्ष करांबरोबरच CGST, बेसिक कस्टम ड्युटी यांसारख्या अप्रत्यक्ष करांचा समावेश होतो.

*कलम २७१: केंद्राच्या प्रयोजनार्थ काही शुल्के व कर यांवरील अधिभार

(Surcharge on certain taxes and duties for purposes of the Centre)

• संसदेला कोणत्याही वेळी कलम २६९ आणि २७० मध्ये उल्लेखलेल्या कर व शुल्कांवर अधिभार (surcharge) आकारण्याचा अधिकार आहे. अशा अधिभाराचे संपूर्ण उत्पन्न केंद्राला प्राप्त होते. त्यातील हिस्सा राज्यांना देण्याची गरज नसते.

*राज्यांनी आकारणी, वसुली व विनियोजन करावयाचे कर

(Taxes levied and collected and retained by the states)

• काही कर संपूर्णपणे राज्यांच्या अखत्यारीत येतात, म्हणजेच त्यांची आकारणी व वसुली राज्यांकडून केली जाऊन त्यांचे उत्पन्नही राज्यांनाच मिळते.

•राज्य सूचीतील विषय क्रमांक ४५ ते ६३ दरम्यान सुमारे १९ अशा करविषयक विषयांचा समावेश आहे. अशा करांपैकी महत्वाचे कर पुढीलप्रमाणेः

i) जमीन महसूल,

ii) कृषि उत्पन्न, उत्तराधिकार यांवरील कर, तसेच कृषि भूमीवरील मालमत्ता कर

iii) जमीन व जमीन, खनीज हक्क, प्राणी व नौका, वाहने, करमणूक, सट्टेबाजी इतरांवरील कर,

iv) मानवी सेवनाकरिता मद्यार्कयुक्त दारू,

v) अफू, भांग, अन्य अंमली औषधीद्रव्ये व अंमली पदार्थ (मद्यार्कयुक्त औषधी व प्रसाधन पदार्थ वगळता)

vi) एखाद्या स्थानिक प्रदेशात उपयोग, वापर किंवा विक्री यासाठी येणाऱ्या मालाच्या प्रवेशावरील कर,

vii) जाहिरातींवरील कर (वर्तमानपत्रातील वगळता), विजेचा वापर किंवा विक्रीवरील कर, रस्ते किंवा अंतर्गत जलमार्गांनी नेल्या जाणाऱ्या वस्तू किंवा प्रवासी यांवरील कर,

viii) व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (महत्तम रु. २,५००),

ix) डोईपट्टी (कॅपिटेशन फी),

x) पथकर

xi) संघ सूचीतील दस्तऐवज वगळता इतरांवरील मुद्रांक शुल्क,

xii) विक्री कर (मानवर्ती वृत्तपत्र) इतर.

*करेतर महसुलाचे वितरण :

(distribution of non tax revenues) :

• केंद्र व राज्ये यांदरम्यान करेतर महुसलाचे वितरण पुढीलप्रमाणे केले जातेः

• **केंद्राच्या करेतर महसुलाचे स्रोत:** i) पोस्ट व टेलिग्राफ, 2)रेल्वे,iii) बँकींग, iv) प्रसारण, v) नाणे आणि चलन, आणि vi) केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रम इत्यादी.

- **राज्यांच्या करेतर महसुलाचे स्त्रोतः**

i) जलसिंचन,ii) वने,iii) मत्स्यव्यवसाय,iv) राज्य सार्वजनिक क्षेत्र उपक्रम.

*राज्यांना सहायक अनुदाने (Grants-in-aid to the States)

- केंद्र व राज्यांदरम्यान कर महसुलाच्या विभागणीव्यतिरिक्त, घटनेमध्ये केंद्राच्या वित्तीय संसाधनांमधून राज्यांना सहायक अनुदाने देण्याचीही तरतूद आहे. अशा प्रकारच्या अनुदानांचे दोन प्रकार असतातः – वैधानिक अनुदाने आणि स्वेच्छाधिन अनुदाने (अर्थात घटनेत त्यांना या नावांनी संबोधलेले नाही.)

अ)(वैधानिक अनुदान :

(Statutory grants)

- कलम २७५ मध्ये राज्यांना द्यावयाच्या वैधानिक अनुदानांची तरतूद आहे. या कलमात अशा अनुदानांच्या दोन प्रकारांची तरतूद आहेः साधारण अनुदाने व विशिष्ट अनुदाने.

1)साधारण अनुदाने (General grants):

संसद कायद्याद्वारे वित्तीय सहाय्याची गरज असलेल्या राज्यांना अशी अनुदाने देण्याची तरतूद करू शकते. म्हणजेच अशी अनुदाने सर्व राज्यांसाठी नसतात. तसेच वेगवेगळ्या राज्यांसाठी वेगवेगळ्या रकमा निश्चित करता येऊ शकतात. या रकमा भारताच्या मंचित निधीवर प्रभारित असतात.

२) विशिष्ट अनुदाने (Specific grants)

: ही अनुदाने कोणत्याही राज्यातील अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी किवा राज्यातील (आसामसहित) अनुसूचित क्षेत्राच्या प्रशासनाचा दर्जा उंचावण्यासाठी दिली जातात.

●ही दोन्ही साधारण तसेच विशिष्ट अनुदाने राज्यांना वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार दिली जातात.

ब) स्वेच्छाधिन अनुदाने (Discretionaty Grants)

• कलम २८२ मध्ये अशा स्वेच्छाधिन अनुदानाची तरतूद आहे त्याअन्वये केंद्र तसेच राज्यांना कोणत्याही सार्वजनिक उद्देशासाठी अनुदाने देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. अशा उद्देशाबाचत कायदा करण्याचा अधिकार संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला नसला तरी त्यांना अशी स्वेच्छाधिन अनुदाने देता येतील. अशी अनुदाने देणे त्यांच्यावर बंधनकारक नसल्याने त्यांना स्वेच्छाधिन अनुदाने असे म्हणतात.

• उदाहरणार्थ, केंद्र सरकार राज्यांना अशी अनुदाने राज्य पंचवार्षिक योजनेला मदत करण्यासाठी देत असते. ती नियोजन मंडळाच्या शिफारशीनुसार दिली जातात. त्यामुळे अशा अनुदानांना ‘राज्य योजनांना केंद्रीय मदत’ असेही संबोधले जाते. अशा मदतीची दोन उद्दिष्ट्ये सांगता येतीलः i) राज्यांना पंचवार्षिक योजनेची लक्ष्ये पूर्ण करण्यासाठी वित्तीय मदत करणे, आणि ii) राष्ट्रीय योजनेची उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी राज्य शासनांच्या प्रयत्नांवर प्रभाव टाकणे केंद्र शासनास शक्य व्हावे म्हणून.

• वैधानिक अनुदानांच्या तुलनेत राज्यांना दिली जाणारी स्वेच्छाधिन अनुदाने खूप अधिक असतात. त्यामुळेच, केंद्र-राज्य वित्तीय संबंधांमध्ये नियोजन मंडळाला वित्त आयोगाच्या तुलनेत अधिक महत्व प्राप्त झाले आहे. नियोजन मंडळ मात्र एक असंवैधानिक तसेच अवैधानिक संस्था आहे.

*वित्त आयोग :

(Finance commission)

• कलम २८० मध्ये वित्त आयोगाच्या स्थापनेची तरतूद एक अर्ध-न्यायिक संस्था म्हणून करण्यात आलेली आहे. राष्ट्रपती दर पाच वर्षांनी किंवा त्या आधीच वित्त आयोगाची स्थापना करतात.

• राष्ट्रपतींना पुढील बाबींबद्दल शिफारशी करणे हे वित्त आयोगाचे कार्य असतेः

१) केंद्रीय विभाजनक्षम कर महसुलीची विभागणी केंद्र आणि राज्यांमध्ये तसेच विविध राज्यांमध्ये करण्याबाबत शिफारस.
२) केंद्राने आपल्या संचित निधीतून राज्यांना द्यावयाच्या सहायकअनुदानांची तत्वे.
३) राज्याच्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीच्या आधारे राज्यातील स्थानिक शासनसंस्थांच्या संसाधनांना पूरक ठरण्यासाठी राज्याच्या संचित निधीत वाढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना
४) वित्त व्यवस्था बळकट व्हावी यादृष्टीने राष्ट्रपतीनी आयोगाकडे निर्देशित केलेली अन्य कोणतीही बाब.

घटनेने वित्त आयोगाची निर्मिती भारताच्या राजकोषीय संघराज्यवादाचे संतुलनचाक (बॅलेंसिंग ऑफ फिस्कल)

- **राज्यांच्या कारविषयक संबंधांचे संरक्षण**
- **(Safeguard-ing States' interests)**

राज्यांच्या करविषयक हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी घटनेने कलम २७४ मध्ये काही तरतुदी केलेल्या आहेत. त्यानुसार पुढील विधेयके संसदेत केवळ राष्ट्रपतींच्या पूर्व शिफारसीनुसारच मांडता येतीलः

१) राज्ये ज्यामध्ये हितसंबंधित आहेत असा कर लावणारे किंवा बदलविणारे विधेयक,
२) कृषि उत्पन्न' या शब्दप्रयोगाचा अर्थ बदलविणारे विधेयक,
३) राज्यांना ज्या तत्वांवर पैसे वितरित केले जातात त्या तत्वांमध्ये बदल करणारे विधेयक, आणि

४) केंद्राच्या प्रयोजनार्थ कोणत्याही कर किंवा शुल्कावर विशिष्ट अधिभार लावणारे विधेयक.

*आंतर-शासकीय कर संरक्षण (mutual exemption from taxation)

• इतर संघराज्यीय घटनांप्रमाणेच भारताच्या घटनेतही 'पारस्परिक करांपासून संरक्षणा' च्या तत्वाचा स्विकार करण्यात आलेला आहे. त्याबाबत पुढील तरतुदी घटनेत आहेतः

अ) केंद्राच्या मालमत्तेस राज्याच्या कर आकारणीपासून सूट (Exemption of Central property from State taxation)

• केंद्राच्या मालमत्तेला (स्थावर तसेच जंगम) राज्याने किवा राज्यातील कोणत्याही प्राधिकाऱ्याने (स्थानिक स्वराज्य संस्था) लावलेल्या सर्व करांपासून सूट असेल. मात्र, संसद कायद्याद्वारे ही अट नष्ट करू शकते. ही मालमत्ता सार्वभौम किवा व्यापारी उद्देशासाठी वापरता येईल.

• मात्र, केंद्र शासनाच्या कंपन्या/महामंडळांना राज्य करांपासून सूट प्राप्त होणार नाही, कारण त्यांना स्वतंत्र न्यायिक अस्तित्व असते.

ब) राज्य मालमत्ता आणि प्राप्ती यांना केंद्राच्या कर आकारणीपासून सूट (Exemption of State property or income from Central taxation)

• राज्याची मालमत्ता व प्राप्ती यांना केंद्राच्या कर आकारणीपासून सूट असेल. ही प्राप्ती सार्वभौम किंवा व्यापारी कार्यांमधून झालेली असू शकते.

• मात्र, संसद कायद्याद्वारे पुढील तरतुदी करू शकतेः

i) राज्याच्या व्यापारी स्वरूपाच्या कामांवर कर आकारू शकते,

ii) एखादा व्यापार किंवा व्यवसाय राज्यशासनाच्या सर्वसाधारण कार्यांना अनुषंगिक (incidental) म्हणून घोषित करू शकेल, जेणे करून केंद्रास त्यावर कर आकारता येणार नाही.

• राज्यातील स्थानिक प्राधिकाऱ्यांच्या मालमत्ता आणि प्राप्तीला मात्र केंद्राच्या कर आकारणीपासून सूट देण्यात आलेली नाही. तसेच राज्य शासनाच्या कंपन्या/महामंडळे यांच्या मालमत्ता आणि प्राप्तीवरही केंद्रीय कर लावता येऊ शकतात.

• १९६३ मध्ये सर्वाच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार, राज्याला सीमा शुल्कातून (custom duty) किंवा उत्पादन शुल्कातून (ex-cise duty) सूट प्राप्त होणार नाही. म्हणजेच, केंद्र सरकार राज्याने आयात किंवा निर्यात केलेल्या वस्तूंवर सीमा शुल्क, तसेच राज्याने उत्पादीत केलेल्या वस्तूंवर उत्पादन शुल्क आकारू शकते.

*केंद्र व राज्यांची कर्जउभारणी:

(Borrowing by the Centre and the States):

• घटनेमध्ये कलम २९२ व २९३ मध्ये केंद्र व राज्यांच्या कर्ज उभारणीच्या अधिकाराबद्दल पुढील तरतुदी करण्यात आल्या आहेतः

१) केंद्र सरकार संसदेने कायद्याद्वारे घातलेल्या मर्यादांच्या आत भारताच्या संचित निधीच्या प्रतिभूतीवर भारतातून तसेच परदेशातून कर्जे घेऊ शकते, तसेच कर्जहमी देऊ शकते. (अर्थात, संसदेने असा कायदा केलेला नाही.)

२) राज्य सरकार राज्य विधानमंडळाने कायद्याद्वारे घातलेल्या मर्यादांच्या आत राज्याच्या संचित निधीच्या प्रतिभूतीवर भारतातून कर्जे घेऊ शकते, तसेच कर्जहमी देऊ शकते. राज्य शासन मात्र परदेशातून कर्जे घेऊ शकत नाही.

३) केंद्र सरकार कोणत्याही राज्याला कर्ज देऊ शकते किंवा राज्यांनी घेतलेल्या कर्जांना हमी देऊ शकते. राज्यांना द्यावयाच्या कर्जाची रक्कम भारताच्या संचित निधीवर प्रभारित असेल.

४) केंद्राने राज्याला दिलेल्या कर्जाचा किंवा केंद्राने राज्याला हमी दिलेल्या कर्जाचा कोणताही हिस्सा थकित असेल तर, राज्य केंद्राच्या संमतीविना कर्ज घेऊ शकणार नाही.

अशा रीतीने केंद्र व राज्य संबंधांमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण असा घटक म्हणजे वित्तीय संबंध हा वित्तीय संबंध वरील विविध तरतुदींद्वारे मुद्द्यांद्वारे स्पष्ट करण्यात आला आहे